Tel. No. : 2654 30 00
2654 33 00
Extn. : 3215, 3216
Fax : 2654 0013
Dir. : 2652 7978
2652 6040
2654 3215

**University of Mumbai**

**Eligibility & Migration Certificates Unit**
Dr. Babasaheb Ambedkar Bhavan,
Vidyanagari, Santacruz (East),
MUMBAI - 400 098.
e-mail : dr@admn.mu.ac.in

No. Elg./ 5657/07/2013.
Date : 12/7/2013.

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECD/201 /-
15 JUL 2013
14133

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था

महोदय / महोदया,

विषय :- परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत महत्त्वाची सूचना.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, दहशतवाद विरोधी पथक, यांच्यासोबत वारंवार झालेल्या चर्चेअंती असे निदर्शनास आले की मुंबई विद्यापीठात पुढील शिक्षणासाठी अनेक परदेशी विद्यार्थी येत असतात त्यातील काही विद्यार्थी मात्र प्रत्यक्ष न येता परस्पर मध्यस्थ व्यक्तीकडून प्रवेश प्रक्रिया करतात व प्रवेशाच्यावेळी देण्यात आलेला त्यांचा वास्तव्याचा पत्ता (Hostel Address) असतो परंतू काही कालावधीनंतर ते त्या पत्यावर राहत नाहीत असे निदर्शनास आलेले आहे सदर बाबीवर उपाययोजना म्हणून आपणांस असे कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयात परदेशी विद्यार्थी / विद्यार्थीनींना कोणत्याही अभ्यासक्रमास प्रवेश देताना खालील बाबी कटाक्षाने पाळण्यात याव्यात.

१. प्रवेश देताना सदर विद्यार्थी उपस्थित असणे आवश्यक आहे.
२. सदर विद्यार्थी / विद्यार्थीनी यांची ओळख पटण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची काटेकोरपणे तपासणी करण्यात यावी. उदा. पासपोर्ट, Student Visa / Tourist Visa व Registration in FRRO.
३. विद्यार्थी ज्या अभ्यासक्रमास प्रवेश घेण्यास इच्छुक असेल त्या अभ्यासक्रमाच्या अध्यादेशानुसार आवश्यक गुणपत्रिका, (१०+२) प्रमाणपत्रे व Passport, Visa इ. सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती पात्रता प्रमाणपत्र अर्जाच्या सोबत जोडण्यात यावेत.
४. ज्या विद्यार्थ्यांची गुणपत्रिका Online Printout असेल अशा विद्यार्थ्यांच्या संबंधित बोर्ड / विद्यापीठातून Confidential Transcript मागवून पात्रता प्रमाणपत्र विभागास सादर करण्यात यावी.
५. विद्यार्थी / विद्यार्थीनी मुंबईमध्ये ज्या ठिकाणी वास्तव करीत असतील त्या ठिकाणचा पूर्ण पत्ता आणि त्यांचा कायम स्वरुपाचा पत्ता यांची माहिती घेणे आवश्यक आहे. (Address Proof)

उपरोक्त सर्व कागदपत्रांची तपासणी करत असताना काही संशयास्पद आढळल्यास त्वरीत नजीकच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. तसेच खालील दिलेल्या पत्त्यावर माहिती पुरविण्यात यावी.

The Deputy Commissioner,
Foreign Regional Registration Officer,
Special Branch Building, Annex – II,
3rd Floor, Badruddin Tayyabji Marg,
Behind St. Xavier's College,
Mumbai – 400 001.
Tel. #2262 1169, 2262 0446.

16/7/13

कुलसचिव
मुंबई विद्यापीठ